महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
द्वारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व्हे नं. 832 अ भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे.

दुरध्वनी क्र.:-020-26123066/67 वेबसाईड:-www.deledexam.in ई-मेल:- deledexam@gmail.com

जा.क्र. मरापप/डीएलएड/प्रशा/2024/ 4770 दि. 06/11/2024

# परिपत्रक

## डी.एल.एड. परीक्षा डिसेंबर-2024 केद्रनिश्चिती, केंद्रसंचालक व जिल्हा स्टेशनरी परिरक्षक नियुक्तीबाबत.

डी.एल.एड. परीक्षा डिसेंबर-2024 दि. 12/11/2024 ते 21/11/2024 अखेर प्राचार्य DIET (सर्व) यांनी परिषदेच्या www.deledexam.in या संकेमस्थळावर केंद्रनिश्चिती ऑनलाईन करावयाची आहे.

**A] परीक्षा केंद्राची निश्चिती करताना प्रामुख्याने खालील बाबी विचारात घ्याव्यात.**

1) परीक्षा केंद्र ज्या ठिकाणी आहे त्या शाळेमध्ये फर्निचर, पिण्याच्या पाण्याची सोय, वीज, स्वच्छतागृह इ. सोय असावी.
2) दळणवळणाच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांना सोयिस्कर होईल असे ठिकाण परीक्षा केंद्र म्हणून निवडण्यात यावे.
3) यापूर्वी उपद्रव ठरलेल्या किंवा गैरमार्ग अवलंब झालेल्या ठिकाणाची परीक्षा केंद्र म्हणून निवड करण्यात येवू नये.
4) केंद्रसंचालकाचे नाव व जिल्हा स्टेशनरी परिरक्षकाचे नाव निश्चित करताना एकदा निश्चित केलेले नाव पुन्हा बदलण्यात येवू नये.
5) परीक्षा केंद्र इमारतीच्या संदर्भात संबंधित प्राचार्यांनी लेखी संमती घ्यावी.
6) सर्वसाधारणपणे द्वितीय वर्षाची विद्यार्थी संख्या विचारात घेऊन प्रत्येकी 100 ते 300 विद्यार्थ्यांसाठी एक परीक्षा केंद्र याप्रमाणे जिल्ह्यातील परीक्षा केंद्राची संख्या निश्चित करावी.

**B] आपल्या जिल्ह्यातील केंद्र निश्चितीसाठी कृतीओघ तक्ता (Flow Chart) खालीलप्रमाणे दिलेला आहे.**

1) प्राचार्य DIET लॉगीन आय.डी. व पासवर्ड टाकावे.
↓
2) DIET चे पॅनल ओपन होईल.
↓
3) पॅनल वरील Center Registration वर क्लिक करावे.
↓
4) परीक्षा केंद्राचा माहिती बॉक्स दिसेल. (उदा. विभाग, जिल्हा, तालुका, परीक्षा केंद्राचे नाव, पत्ता, केंद्राची विद्यार्थी संख्या, केंद्रसंचालकाचे नाव, पद, कार्यालयाचा पत्ता, केंद्रसंचालकांचा Bank Account No., IFSC Code No., बँकेचे नाव व शाखा, ई-मेल, मोबाईल नंबर इ.) सर्व माहिती विनचूक भरावी.
↓
5) Submit बटनावर क्लिक करावे.
↓
6) पॅनलवरील Center Allocation वर क्लिक करावे.
↓
7) जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयांची खालीलप्रमाणे माहिती दिसेल.

| अ.क्र. | अध्या.विद्या. सांकेतांक | अध्या.विद्या. चे नाव | 2016 च्या अभ्यासक्रमाची विद्यार्थी संख्या | add |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

Add बटनावर क्लिक करावे. त्यानंतर उजव्या बाजूला छोटा पॅनल दिसेल. रजिस्टर केलेल्या परीक्षा केंद्रांची माहिती दिसेल. संबंधित अध्यापक विद्यालय कोणत्या केंद्राला जोडावयाचे त्या केंद्राला क्लिक करावे. त्यानंतर त्या अध्यापक विद्यालयासमोर निवडलेल्या परीक्षा केंद्राचे नाव दिसेल.

C] **आपल्या जिल्ह्यातील स्टेशनरी परिरक्षक नियुक्तीसाठी कृतीओघ तक्ता (Flow Chart) खालीलप्रमाणे दिलेला आहे.**

1) प्राचार्य DIET लॉगीन आय.डी. व पासवर्ड टाकावे.

↓

2) DIET चे पॅनल ओपन होईल.

↓

3) पॅनल वरील Custodian Registration वर क्लिक करावे.

↓

4) Custodian च्या माहितीचा बॉक्स दिसेल. (उदा. विभाग, जिल्हा, तालुका, जिल्हा स्टेशनरी परिरक्षकाचे नाव, पत्ता, पद, कार्यालयाचा पत्ता, स्टेशनरी परिरक्षकाचा Bank Account No., IFSC Code No., बँकेचे नाव व शाखा, ई-मेल, मोबाईल नंबर इ.) सर्व माहिती बिनचूक भरावी.

↓

5) Submit बटनावर क्लिक करावे.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-4

**प्रत** - 1) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
2) शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (दक्षिण विभाग)



Scanned with OKEN Scanner